**<u>ठळक बातम्या</u>**

- दावोसमध्ये झालेल्या गुंतवणुकीपैकी ९८ टक्के थेट परदेशी गुंतवणूक असल्याची मुख्यमंत्र्यांची माहिती

- सायबर फसवणूक प्रकरणी छत्तीसगड पोलिसांकडून ६२ जणांना अटक
- भारतीय स्पर्धा आयोगानं व्हॉटसॲपवर आणलेली बंदी एनसीएलएटीकडून अंशत: स्थगित

**आणि**

- पोलंडची इगा श्वियांतेक ऑस्ट्रेलियन खुल्या टेनिस स्पर्धेच्या उपांत्य फेरीत पराभूत

**<><><><><>**

स्वित्झर्लंडच्या दावोस इथं सुरू असलेल्या जागतिक आर्थिक मंचादरम्यान महाराष्ट्रानं केलेल्या सामंजस्य करारांच्या एकंदर गुंतवणुकीपैकी ९८ टक्के गुंतवणूक ही थेट परदेशी गुंतवणुकीच्या स्वरूपात असून यामुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळेल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. ते दावोस इथून वार्ताहर परिषदेत बोलत होते. या परिषदेदरम्यान महाराष्ट्रानं एकंदर ६१ सामंजस्य करार केले असून त्यामुळे १५ लाख ७० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक राज्यात होणार असल्याची माहिती त्यांनी दिली. यात गुंतवणुकीसाठीचे ५४, तर उर्वरित ७ धोरणात्मक सामंजस्य करार असल्याचं त्यांनी सांगितलं. संपूर्ण जगाचा भारताकडे पाहण्याचा दृष्टिकोन उत्सुकतेचा, किंबहुना विश्वासाचा आहे, अशी ग्वाही त्यांनी दिली.

**<><><><><>**

दावोसमध्ये गेल्यावर्षी झालेल्या सामंजस्य करारापैकी किती अंमलात आले याची माहिती देण्याचं आवाहन विधान परिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी मुख्यमंत्री आणि उद्योगमंत्र्यांना केलं आहे.

दावोसमध्ये झालेल्या सामंजस्य करारातल्या २९ पैकी २८ कंपन्या भारतातल्या आहेत. २८ पैकी २० राज्यातल्या आहेत. २० पैकी १५ मुंबईतल्या, ४ पुण्यातल्या, एक ठाण्यातली आहे. असं असताना दावोस दौरा कशासाठी असा सवाल विधान परिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केला आहे. त्यावर मुख्यमंत्री म्हणाले,

**होल्ड बाइट - देवेंद्र फडणवीस**

**<><><><><>**

प्रजासत्ताक दिनी करण्यात येणाऱ्या संचलनाचा सराव आज नवी दिल्लीत कर्तव्यपथावर करण्यात आला. सरावादरम्यान टी-90 टँक, नाग क्षेपणास्त्र यंत्रणा, आणि पिनाका रॉकेट यंत्रणेने देशाच्या लष्कराच्या सामर्थ्याचं दर्शन घडवलं. विविध सैनिकी तुकड्यांसह विविध राज्यातील चित्ररथांनी सामर्थ्य आणि सांस्कृतिक ऐक्याचं प्रदर्शन केलं. भारतीय हवाई दलाच्या अनेक लढाऊ विमानांनी कर्तव्यपथावर साहसी कसरती केल्या. _विविध राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांचे २६ चित्ररथ संचलनात सहभागी होणार असून स्वर्णिम भारत – विरासत और विकास ही यंदाची थीम आहे.

युद्धस्थळ टेहळणी यंत्रणा तसंच संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेच्या प्रलय शस्त्र यंत्रणेचं प्रदर्शन हे यावेळच्या संचलनाचं मुख्य आकर्षण असेल असं मेजर जनरल सुमित मेहता यांनी सांगितलं. संचलनादरम्यान, भिष्मा टी-90 टँक,

नाग क्षेपणास्त्र यंत्रणा, बजरंग लाईट स्पेशलिस्ट व्हेइकल, नंदीघोष जलद प्रतिक्रिया दल वाहन, ब्राह्मोस, अग्नीबाण, पिनाका, आकाश शस्त्र यंत्रणा याद्वारे भारताच्या लष्करी सामर्थ्याचं दर्शन घडणार आहे. याशिवाय केंद्रीय सशस्त्र पोलीस दल आणि एनसीसीची तुकडीही संचलनात सहभागी होणार आहे. २६ जानेवारी रोजी सकाळी साडे दहा वाजता संचलनाला सुरुवात होईल आणि ९० मिनिटं संचलन करण्यात येईल.

यंदा **इंडोनेशियाच्या** सैन्यदलाची तुकडीही संचलनात सहभागी होणार आहे. या संचलनात इंडोनेशियन लष्कराचे ३५२ जवान सहभागी होतील. **प्रजासत्ताक दिनाच्या** मुख्य सोहळ्यात मूळच्या **बीड** जिल्ह्यातल्या वडवणी तालुक्यातल्या देवडी इथल्या फ्लाईंग ऑफीसर दामिनी देशमुख या परेड कमांडर आहेत. त्या ध्वजारोहणानंतर ध्वजावर  पुष्पवृष्टी करणार आहेत.

**<><><><><>**

सायबर फसवणूक प्रकरणी छत्तीसगड पोलिसांनी एक मोठी मोहीम राबवत ६२ जणांना अटक केली आहे. या मोहिमेत छत्तीसगड, राजस्थान आणि ओदिशा या राज्यांमधल्या सुमारे ४० ठिकाणांवर पोलिसांनी छापे घातले. त्यात अटक केलेल्यांमधे नायजेरियाच्या तीन नागरिकांचा समावेश आहे. ऑपरेशन सायबर शिल्ड या नावानं राबवलेल्या या मोहिमेत १०० पेक्षा जास्त पोलीस अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सहभाग होता, असं रायपूर परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक अमरेश मिश्रा यांनी सांगितलं.

**<><><><><>**

सीसीआय अर्थात भारतीय स्पर्धा आयोगानं व्हॉटसॲपवर आणलेली बंदी एनसीएलएटी अर्थात राष्ट्रीय कंपनी कायदा अपील न्यायाधिकरणाने अंशत: स्थगित केली आहे. एनसीएलएटी पीठाचे न्यायमूर्ती अशोक भूषण यांनी हे निर्देश दिले. भारतात ५० कोटी व्हॉट्सॲपग्राहक असून त्यावर बंदीमुळे हा व्यवसाय विस्कळीत होईल, असं त्यांनी निर्देशात म्हटलं आहे.

सीसीआयने व्हॉट्सॲपवर डेटा शेअरिंग पद्धतींबद्दल पाच वर्षांची बंदी घातली होती. पुढच्या उपाययोजनांची चाचपणी मेटा करेल आणि लाखो व्यवसायिकांच्या व्हॉट्सॲपकडून असलेल्या अपेक्षा पूर्ण करेल असं मेटानं निवेदनात म्हटलं आहे. सीसीआयनं ठोठावलेल्या २१३ कोटी रूपयांच्या दंडाच्या निम्मी रक्कम मेटानं जमा करावी असे निर्देशही न्यायाधिकरणाने दिले आहेत.

**<><><><><>**

ॲन्ड्रॉइड आणि आयफोनच्या प्रवाशांना इतरांपेक्षा वेगळं भाडं आकारण्याबद्दल केंद्र सरकारच्या ग्राहक व्यवहार विभागानं ओला आणि उबरवर नोटिसा बजावल्या आहेत. केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणाच्या माध्यमातून ही नोटीस बजावण्यात आली असून त्याबद्दल ऑनलाईन प्रतिसाद मागवल्याचं केंद्रीय ग्राहक व्यवहार मंत्री प्रल्हाद जोशी यांनी आज सांगितलं.

**<><><><><>**

भारताच्या देशांतर्गत हवाई प्रवासी वाहतुकीत गेल्या वर्षभरात ६ पूर्णांक १२ शतांश टक्क्याची वाढ झाली. गेल्या वर्षी १६ कोटी १३ लाख प्रवाशांनी हवाई मार्गांचा वापर केला. गेल्या वर्षात देशांतर्गत उड्डाणं रद्द झाल्याचं प्रमाण १ पूर्णांक

७ शतांश टक्के इतकं होतं. त्यामुळे ६७ हजार ६२२ प्रवाशांना फटका बसला, अशी माहिती नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने दिली आहे.

**<><><><><>**

दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी प्रचार सभा घेतली. किराडी मतदारसंघात जाहीर सभेत त्यांनी दिल्लीतले खराब रस्ते, अस्वच्छता या मुद्द्यावरून आम आदमी पार्टीवर टीका केली. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे यांचा विश्वासघात केल्याचा आरोप त्यांनी आपचे निमंत्रक अरविंद केजरीवाल यांच्यावर केला. भाजपाचे अध्यक्ष जे पी नड्डा, उत्तराखंड मुख्यमंत्री पुष्कर सिंग धामी, मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांच्याही प्रचारसभा झाल्या.

काँग्रेस नेते पवन खेरा यांनी आज पक्षाच्या गीताचं अनावरण केलं. यावेळी मद्य घोटाळ्यावरुन त्यांनी केजरीवाल यांच्यावर टीका केली.

**<><><><><>**

पाचवेळची ग्रँडस्लॅम विजेती, जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर असलेली पोलंडची इगा श्वियांतेक हिला ऑस्ट्रेलियन खुल्या टेनिस स्पर्धेच्या उपांत्य फेरीत पराभवाचा धक्का बसला. अमेरिकेच्या मॅडिसन कीज हिनं अटीतटीच्या सामन्यात तिच्यावर ७-५, ६-१, ७-६ अशी मात केली. आता अंतिम फेरीत मॅडिसनचा सामना शनिवारी अग्रमानांकित अरीना सालाबेंका हिच्याशी होईल. सालाबेंका हिनं उपांत्य फेरीत स्पेनच्या पॉला बाडूसा हिचा ६-४, ६-२ असा सहज पराभव केला.

दरम्यान, पुरुष एकेरीचे उपांत्य फेरीचे सामने उद्या होणार आहेत. यात सर्बियाचा नोव्हाक ज्योकोविच आणि जर्मनीचा अलेक्झांडर झ्वेरेव्ह एकमेकांविरुद्ध

मैदानात उतरतील, तर दुसऱ्या सामन्यात अग्रमानांकित, इटलीच्या यानिक सिनर याच्यासमोर अमेरिकेच्या बेन शेल्टनचं आव्हान असेल.

**<><><><><>**

एकोणीस वर्षांखालच्या महिला क्रिकेट टी-ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेत, आज क्वालालंपूर इथं झालेल्या सामन्यात भारतानं श्रीलंकेवर ७ गडी राखून विजय मिळवला. सुरुवातीला, श्रीलंकेनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला. भारतानं निर्धारित २० षटकांत ९ गडी गमावून ११८ धावा केल्या. या धावसंख्येचा पाठलाग करताना श्रीलंकेची सुरुवात खराब झाली. सुरुवातीच्या २४ चेंडूत अवघ्या १२ धावात त्यांच्या ५ फलंदाज तंबूत परतल्या. २० षटकात ९ गडी गमावून  त्यांना फक्त ५८ धावाच करता आल्या.

**<><><><><>**

जकार्ता इथं सुरू असलेल्या इंडोनेशिया मास्टर्स सुपर फाईव्ह हंड्रेड बॅडमिंटन स्पर्धेत आज भारतीय खेळाडूंची कामगिरी खराब झाली.